8/1/22, 4:13 PM

सामना

# महिला आयोगाकडे वैवाहिक समस्येच्या सर्वाधिक तक्रारी

## मजबूत पाठबळ व झटपट न्यायामुळे पीडित महिलांची आयोगात धाव

मुंबई, दि. २८ (प्रतिनिधी) - घर असो अथवा कार्यालय, सार्वजनिक किंवा खासगी ठिकाण, ओळखीच्या किंवा अनोळखी लोकांकडून कुठल्या न कुठल्या प्रकारे महिलांवर अन्याय-अत्याचार होत असतो. काही महिला हा अन्याय गपगुमान सहन करतात तर अनेक जणी त्याविरोधात आवाज उठवतात. राज्य महिला आयोगाकडे अशा अनेक तक्रारी पीडित महिलांकडून येत असून त्यात वैवाहिक समस्येबाबतच्या सर्वाधिक तक्रारींची नोंद होत आहे.

महिलांवरील अन्याय, अत्याचाराचे प्रमाण कमी झालेले नाही. उलट दररोज महिलांवरील अत्याचाराच्या घटना कुठे न कुठे घडतच असतात. बऱ्याच महिला तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करतात, तर अनेक महिलांना दाद कुठे आणि कशी मागायची हेच समजत नाही. या सर्व बाबींची दखल घेत महिला आयोगाने पीडितांना सहज तक्रार करून अन्यायाला वाचा फोडता यावी व समस्येतून सुटका करता यावी यासाठी विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. परिणामी आयोगाकडे तक्रार करणे सहज शक्य झाल्यामुळे पीडित महिला आता राज्यातून कुठूनही आपल्या तक्रारी करू लागल्या आहेत. मुख्य म्हणजे तक्रारीचे निरसनदेखील झटपट केले जात असल्याचे चित्र आहे. सहा, दहाअंकी हेल्पलाइन, ई-मेल, लेखी अर्जाद्वारे तक्रारी केल्या जात असून अशा महिलांचे समुपदेशन, त्यांना पोलीस ठाणे मदत, विधी व न्याय सेवा प्राधिकरणाची मदत देण्याचे काम आयोगाकडून केले जात असल्याचे एका अधिकारी महिलेने सांगितले.

राज्याच्या कानाकोपऱ्यातून आयोगाकडे विविध माध्यमांतून महिलांच्या तक्रारी येत असतात. प्रत्येक पीडितेला मुंबई कार्यालयात येणे शक्य होत नाही. त्यामुळे अशा महिलांना त्यांच्या जिल्ह्याच्या ठिकाणीच भेटून समस्येचे निराकरण करण्यासाठी 'महिला आयोग तुमच्या दारी' ही मोहीम सुरू केली आहे. जिल्ह्याच्या ठिकाणी आयोगाच्या पदाधिकारी, स्थानिक पोलीस अधिकारी यांच्यासमोरच महिलेची तक्रार ऐकून तिच्या समस्येची सोडवणूक केली जात आहे.

■ रूपाली चाकणकर, अध्यक्षा - महिला आयोग



### सहाअंकी हेल्पलाइनचा फायदा

लक्षात राहील व सहज डायल करता यावे म्हणून आयोगाने फेब्रुवारीपासून १५५२०९ ही सहाअंकी हेल्पलाइन सुरू केली. त्यामुळे पीडितांना त्याचा फायदाच होऊ लागला आहे. अवघ्या पाच महिन्यांत या हेल्पलाइनवर १७६६ तक्रारींची नोंद झाली असून सर्वच्या सर्व तक्रारी निकालीदेखील निघाल्या आहेत, तर या तुलनेत ७४७७७२२४२४ या हेल्पलाइनवर पाच महिन्यांत ६८० तक्रारी आल्या व त्याही निकाली काढण्यात आल्या आहेत.

■ महिलेला घरात पती, सासरच्या लोकांकडून त्रास दिला जातो. मोबाईल बघत बसू नको, घराबाहेर जाऊ नको, फार कोणाशी बोलू नको असे वारंवार टोकले जाते. तर कार्यालयाच्या ठिकाणीदेखील लैंगिक शोषण तसेच त्रास देण्याचा प्रकार केला जातो. ज्या तक्रारी येतात त्याअनुषंगाने प्रश्न विचारून महिलेला प्रेरणा देणे, तिच्यातील शक्ती तिला दाखवून देणे, सर्व संकटावर मात कशी करू शकते, त्यातून मार्ग कशी काढू शकते, स्वतःचा अधिकार कशी मिळवू शकते याबाबत पीडितेला सांगितले जात असल्याचे सांगण्यात आले.

### आठ महिन्यांत सात हजार तक्रारी

| समस्या | एकूण तक्रारी | निकाली निघाल्या |
|---|---|---|
| वैवाहिक समस्या | २८८७ | २४१७ |
| सामाजिक समस्या | १९१४ | १७२५ |
| मालमत्तेविषयक | ४०५ | ३०१ |
| कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ | ४७ | २५ |
| कामाच्या ठिकाणी होणारा छळ | ५२७ | २०० |
| इतर समस्या | १४९८ | १३३४ |

Mumbai Edition
Jul 29, 2022 Page No. 5
Powered by : eReleGo.com